International Referred Research Journal, January, 2011. ISSN- 0974-2832 VoL.II *ISSUE-24

शोध पत्र- समाजशास्त्र

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रवाद या विचारांचे समाजशास्त्रीय अध्ययन

* प्रा. रवि सोपान डाखोरे

January, 2011

* श्रीमती कोकिळाबाई गावंडे महिला महाविद्यालय, दर्यापूर, अमरावती

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा शोध घेणे अत्यंत कठीण काम आहे. एक सामाजिक कार्यकर्ता, क्रातीकारक पुरुष, समाज सुधारक, राजकिय विचारवंत, कायदेपंडीत, घटनेचे शिल्पकार, अर्थतंज्ञ, इतिहास संशोधक, तंत्वचिंतक, समाजशास्त्रज्ञ अशा किती तरी गुणांनी त्यांचे व्यक्तीमत्व संमृध्द होते. अशा सर्व गुणाची पडताळणी करतांना त्यांचा समाज जीवना बाबतचा समाजशास्त्रीय दृष्टीकोण स्पष्टपणे जानवतो.त्यांचा असा कोणताही विचार नाही की, तो राष्ट्रवादाशी जुळला नाही. त्यांमुळे राष्ट्रवाद संकल्पनेच्या संदर्भात ज्या विचाराची मांडणी एक संशोधक म्हणून करता आली. ती मांडणी शोध निबंधामध्ये करण्याचा अल्पसा प्रयत्न आहे. योहान फिक्टे यांच्या मते ''राष्ट्रवाद म्हणजे व्यक्ती जीवनाची राष्ट्र जीवनाशी सैध्दातिक सांगड घालण्याचे कार्य.''[1]

म्हणजेच राष्ट्रीय पातळीवर समतेची व एकतेची भावना निर्माण करणे.''म्हणजेच स्वतःच्या समुहापुरती एकतेची आपलेपणाची व समुहाबाबत वेगळे पणाची वृत्ती म्हणजे राष्टीयत्वाची भावना– ही भावना राज्य शासनाच्या रुपाने परिपुर्ण झाली असो वा नसो जी जवळीक व अलगतेची जानिव असते तिलाच राष्ट्रवाद म्हणतात .'[2]

साधारणतः सतराव्या शतकाच्या अखेरेस राष्ट्रवादाला नवे अर्थ व संदर्भ येवू लागले. राष्ट्रवादात स्वांतत्र्य व लोकशाहीला मान्यता लाभली आपल्या राष्ट्रासाठी जगायचे, मरायचे, तन–मन, त्यालाच अर्पण करावयाचे अशा भावनेने माणसे मारल्या गेली भारता सारख्या देशातही याच पद्धतीने संघटीत होवून पांश्चात्या कडून स्विकारलेल्या हत्यारासह उभे राहीले समता, आंदोलने, लोकशाही, व्यक्ती स्वांतत्र्य इत्यादी मुल्यांचा स्विकार राष्ट्रवादात केला राष्ट्रवाद ही निष्ठा कार्य करणारी प्रेरक शक्ती ठरली.''[3]

वरील स्वरुपाच्या विचाराला अनुसरुन बाबासाहेबांचे राष्ट्रवादी विचार दिसून येत नाहीत. ते स्पष्टपणे म्हणतात.'' माझे सामाजिक तत्वज्ञान हे निश्चीत पणे तिन शब्दात गुफले आहे. ते म्हणजे स्वांतत्र्य, समता बंधू भाव हे तत्वज्ञान फ्रेंच राज्यक्रांती पासून उसने घेतले आहे. असे कोणीही समजू नये तत्वज्ञानाची मुळे धर्मात आहेत. माझा गुरु बुध्द यांच्या शिकवणुकीतुन मि काढले आहे.''[4]

त्यांच्या एकुणच सर्व विचारामध्ये राष्ट्र पुर्नबांधणीसाठी '' व्यक्ती व समाज'' या विचाराला प्राधान्य दिले आहे.

राष्ट्रवादाच्या संदर्भात सामाजिक लोकशाहीची संकल्पना स्पष्ट करतांना डॉ. बाबासाहेब म्हणतात '' राजकिय लोकशाहीच्या मुळाशी सामाजिक लोकशाहीचा आधार असेल तरच राजकिय लोकशाहीचे अस्तीत्व टीकुन राहते. सामाजिक लोकशाही म्हणजे स्वांतत्र्य, समता, सामाजिक न्याय व बंधूता हि जिवनाची मुलभूत तत्वे मान्य करणारी पद्धत आहे या तत्वाना अलग करता येणार नाही. भारताला खरोखर राष्ट्र व्हावयाचे असेल तर जाती भेद गाडावा लागेल त्यांशीवाय राष्ट्र कसे होईल.''[5]

डॉ. आंबेडकरांच्या राष्ट्रवादाविषयी पत्रकार अरुण शौरी यांनी शंका उपस्थित करुण Workshipping false Goods Ambedkar and the Facts which have been Erased, New Delhi या ग्रंथात '' देशाच्या स्वांतत्र्यच्या संबंधीत एकाही हालचालीत आंबेडकर सहभागी झाल्यांचे एकही उदाहरणर नाही. याऊलट स्वांतत्र्य चळवळीच्या प्रत्येक वळणावर त्यांनी राष्ट्रीय चळवळीच्या प्रत्येक मोहिमेला विरोधच केला आणि अयशस्वी ठरल्यास आनंद व्यक्त केला.''[6]

गांधी–आंबेडकरवाद, हिंदूच्या पारंपारिक श्रध्दावर आघात, धर्मातराची चळचळ या मुळे आंबेडकरांच्या वास्तवीक राष्ट्रवादी विचारांची वस्तू स्थिती दुर्लक्षील्या गेली राष्ट्रवाद म्हणजे राष्ट्राचे स्वांतत्र्य, एकता, राष्ट्रीय स्वांतत्र्याच्या हक्काचा पुरस्कार. ... विकासोन्मुख व न्यायधिष्ठीत समाज रचना निर्माण करणे व जागतीक शांतता व संहकार्य साध्य करणे ही उदीष्ठे साध्य करण्यासाठी.. व्यक्तीस्वातंत्र्यास पुरक असलेल्या राष्ट्र स्वांतत्र्याचा आग्रह धरण्यास हवा.''[7]

डॉ. आंबेडकर म्हणतात ''सामाजिक परीस्थीतीकडे दुर्लक्ष करुन मीळालेल्या स्वराज्यत शासनाची सुत्रे भारतीय सामाजिक उच्चशिक्षीण संरमजाम दाराच्या हातात जातील ''[8]

असे घडणे कीती तर्क विसंगत आहेत याचे स्पष्टीकरण करताना पुढे म्हणतात '' केवळ आपल्या धण्यात बदल होण्यावर आपण मुळीच समाधान मानता कामा नये तसे कोणत्याही देशाने दुसऱ्या देशावर राज्य असणे चांगले नाही.''[9]

ते पुढे म्हणतात '' आम्हाला सामाजिक आर्थीक गुलामगिरीतुन मुक्त करा म्हणजे आम्ही तुमच्या खांद्यास खांदा लावुन राजकिय स्वातंत्र्यासाठी आमचे प्राण पणास लावु.[10]

देशाला स्वातंत्र्य मिळण्यापुर्वी या देशातील सामाजिक प्रश्न सुटावेत यासाठी ते प्रयत्नशिल होते त्यांना माहित होते की, अस्पृष्य समाज हा ब्रिटीश सरकार व स्पृश्य वर्ग यांच्यात सापडलेला वर्ग होता. म्हणुन आंग्लाई व ब्राम्हणाई या हींदी जनतेला लागलेल्या दोन जळवा आहेत व त्या एक सारख्या हींदु लोकांच्या रक्तांचे शोषण करतात. आंग्लाईने लोकांना देहाने गुलाम बनविले तर ब्राम्हणाईने स्वाभिमानासारख्या संपत्तीचे हरण केले''[11]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रवादी होते, राष्ट्रभक्त होते. परंतु त्यांची राष्ट्राची कल्पना वेगळी होती त्यांना जे देशाचे स्वातंत्र्य हवे होते ते सामाजिक स्वातंत्र्य, त्यांना जी लोकशाही हवी होती ती सामाजिक लोकशाही स्वातंत्र्य इंग्रजांपासुन नव्हे तर स्वकीय वर्गांकडुन हवे होते[12]

बाबासाहेबांची राष्ट्रवादाची भुमीका स्पष्ट करतांना ॲड. नरेंद्र चपळगावकर म्हणतात '' मार्च 1927 मध्ये बहीकृत वर्गांचा महाडच्या चवदार तळ्यांच्या पाणि प्राशनाचा प्रश्न असो की, मनुस्मृती जाळण्याचा प्रसंग असो तर पुण्याच्या पर्वती देवस्थानात अस्पृष्यांना प्रवेश मिळावा म्हणुन सत्याग्रहाचा प्रसंग असो तसेच नाशिक मधिल काळाराम मंदीर प्रवेशाचा असो. अशा सर्व प्रसंगातून त्यांची सामाजिक राष्ट्रवादाची भुमिका लक्षात येते''[13]स्वातंत्र्य, समता व बंधुता या तीन सामाजिक मुल्यांवर डॉ. बाबासाहेबांची जी अपार श्रद्धा होती त्यांच्याशिच त्यांची सामाजिक राष्ट्रवादाची संकल्पना निगडीत असलेली दिसुन येते म्हणुनच त्यांना राजकिय स्वातंत्र्य आधि की, सामाजिक स्वातंत्र्य आधि या वादामध्ये सामाजिक स्वातंत्र्याला प्रथम प्राधान्य दिले. राजकिय स्वातंत्र्य मिळुनही अस्पृष्य, मागास जाती उपेक्षीत राहत असेल तर राजकिय स्वातंत्र्याचा फायदा काय असा प्रश्न नेहमीच ते करीत.

सारांश डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक राष्ट्रवादाच्या संकल्पनेमध्ये स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मुल्यांवर आधारीत व्यक्ती व समाज यांच्या समग्र विचाराला प्राधान्या दिले अशा बाबासाहेबांच्या कार्यांची थोरवी वर्णन करतांना धनंजय किर म्हणतात '' राष्ट्रांच्या इतिहासांवर, राष्ट्रांच्या भविष्य पटलांवर बाबासाहेबांना सर्वव्यापी, सर्वस्पर्शी व्यक्तीमत्वाचा ठसा उमटविला त्यांना अनंत हालअपेष्टा सहन केल्यात परंतु भारतीय संस्कृतीचा प्रवाह त्यांनी सोडला नाही'' त्यांचे भारतीय समाजावर, संस्कृतीवर निस्सीम प्रेम होते हे त्यांच्या सामाजिक राष्ट्रवाद या कार्यावरून स्पष्ट होते.अशा महान राष्ट्रवादी नेत्यांच्या राष्ट्रीय प्रेम व संस्कृती प्रेमांच्या कार्याचा आढावा घेण्याचा अल्पसा प्रयत्न या शोध निबंधातुन केला आहे.

## संदर्भ ग्रंथ

1. तर्कतिर्थ जोशी लक्ष्मणशास्त्री :– ''मराठी विश्वकोष'' खंड 14 महाराष्ट्र राज्य मराठी विश्व कोष निर्मीती मंडळ मुंबई 1989 पृ.क. 851 2. गर्गे स.मा. :–भारतीय समाजविज्ञान कोष खंड 4 समाजविज्ञान मंडळ पुर्ण 1990 पृ.क.210 3. कित्ता :– पृ.क. 213 4. डॉ. बाबासाहेब आंबेडकर :– दि. 03/10/1954 रोजी दिल्ली नभोवाणीवरील भाषण 5. डॉ. वाघमारे जनार्दन :– समाजपरीवर्तनाच्या दिशा संकेत प्रकाशन 1995 पृ.क.113 6. फडके य.दी. :–डॉ. आंबेडकरांचे मारेकरी :अरूण शौरी पृ.12 7. तर्कतिर्थ जोशी लक्ष्मणशास्त्री :–''मराठी विश्वकोष'' खंड 14 महाराष्ट्र राज्य मराठी विश्व कोष निर्मीती मंडळ मुंबई 1989 पृ.क. 859 8. गांजरे मा.फ. :– डॉ. आंबेडकरांची भाषणे खंड 2 प .25 9. कित्ता :– प .25 10. किर धनंजय :– डॉ. बाबासाहेब आंबेडकर पॉप्युलर प्रकाशन मुंबई पृ. 6211. :12. साखळकर एकनाथ :– महाराष्ट्राची मान चिन्हे– प्रस्तावना मॅजिस्टेड प्रकाशन पृ.26 13. चपळगावकर नरेंद्र :–भारतीय संविधान डॉ.बाबासाहेब आंबेडकर पृ.10,11